(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# पंडित जवाहरलाल नेहरू यांचे राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा एक विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ.संभाजी संतोष पाटील**

श्री.शि.वि.प्र.संस्थेचे साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालय, धुळे

………………………………………………………,……………………………………......

**प्रस्तावना** :—

भारताच्या राजकारणावर ज्यांचा प्रभाव होता ज्यांच्या विचारांप्रमाणे भारतीय राजकारणाला दिशा मिळत गेली अशी महान व्यक्ती म्हणजे पंडीत जवाहरलाल नेहरू होय. स्वातंत्र्यानंतर सहा वर्षापर्यंत एक 'नेहरूयुग' भारतात निर्माण झालेले दिसून येते. ते भारताचे पहिले पंतप्रधान होते. आधुनिक भारताची जडण—घडण त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार होते. अलिप्त धोरणाचा पाया त्यांनी रचला आणि त्यासाठी तिसऱ्या जगाचे नेतृत्व केले. जागतिक शांततेचा पुरस्कार करणाऱ्या त्यांनी पंचशिल धोरण प्रस्तुत केले. संयुक्त राष्ट्रसंघाशिवाय जग ही कल्पना करता येत नाही या शब्दात त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाला पाठींबा देऊन गौरव केला. पंडीत नेहरू हे लोकशाहीवादी होते. पाश्चिमात्य उदारमताचे संस्कार घेऊन त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान दिले. भारताला समाजवादाशिवाय पर्याय नाही याची त्यांना खात्री झाल्यावर देश स्वतंत्र होताच समताधिष्ठीत उपाययोजनांची त्यांनी अंमलबजावणी केली. समाजवादी समाजरचनेचे काँग्रेसचे धोरण ही त्यांची उपलब्धी होती. शेतीक्षेत्राचे मुलभूत परिवर्तन करण्याच्या हेतुने त्यांनी जमीनदाराचे उच्चाटन, कुळकायदे, सिलींग ॲक्ट अशा धोरणांची आखणी केली. त्यांनी धर्मनिरपेक्ष भारताची उभारणी करण्याच्या दिशेने प्रस्थापितांना काँग्रेसमधील वरिष्ठांचा अगदी महात्मा गांधीजींचाही काही गोष्टींबाबत होणारा रोष पत्करून व देशाची वाटचाल करण्याचा प्रयत्न केला. अल्पसंख्याकांना आपल्या हिताची शाश्वती वाटावी याची ते नेहमी काळजी घेत असत. साम्राज्यशाहीचा, वसाहतवादाला कडाडुन विरोध करणाऱ्या पंडीत नेहरूंनी ब्रिटीश सरकारशी भारताचे संबंध चांगले राहतील याची दक्षता घेतली. त्यांना जागतिक परिस्थितीचे, आंतरराष्ट्रीय संबंधाने देशाची विभागणी दोन गटात होत असतांना भारत व तिसऱ्या जगातील अन्य राष्ट्रांच्या भूमिकेचे जेवढे आकलन होते तेवढे त्या काळातील इतर नेत्यांना नव्हते. शांततामय सहअस्तित्व आणि जागतिक प्रश्नांची युध्दांचा अवलब व बळाचा वापर न करता शांततामार्गाने सोडवणूक करण्यावर दृढ विश्वास होता. आर्थिक नियोजनाची संकल्पना ही त्यांची देणगी आहे. पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करून देशाचे उत्पादन वाढविणे. दरडोई उत्पन्नात वाढ करणे, सर्वसामान्य लोकांच्या किमान गरजांची पुर्तता करणे अशी उद्दिष्टे देशासमोर ठेवली. पंडीत नेहरूंना वैज्ञानिक दृष्टी होती. विज्ञान व तंत्रज्ञानात यांच्या जलदगतीने विकास केल्याशिवाय उत्पादन वाढणार नाही याची त्यांना जाणिव होती म्हणून त्यांनी राष्ट्रीय प्रयोगशाळा उच्च दर्जाचे तंत्रज्ञान, शैक्षणिक संस्था यांची उभारणी केली. संशोधनास चालना दिली ते स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. अनेक बाबतीत मतभेद असूनही महात्मा गांधीविषयी त्यांना विलक्षण श्रध्दा होती त्यामुळे ते गांधीजींचे उत्तराधिकारी बनले. आपले व्यक्तीगत आणि खाजगी आयुष्य बाजूला सारून सततचा तुरूंगवास चळवळीच्या काळातील दहा वर्ष तुरूंगवास, शारिरीक यातना, मानसिक ताण—तणाव यांनी ओतप्रत भरलेल्या राजकीय जिवनात स्वत:ला त्यांनी झोकून दिले. भारतासाठी त्यांचे कार्य फार मोलाचे व उपयुक्त आहे.

**संशोधनाचा उद्देश** :—पंडील जवाहरलाल नेहरू यांचे राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोधनिबंधाचा उद्देश आहे.

**संशोधनाची उदिदष्टये** :—

(१) पंडीत नेहरू यांची राष्ट्रनिर्माणातील योगदानाची माहीती अभ्यासणे.

(२) पंडीत नेहरू यांचे राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद याविषयी माहिति जाणुन घेणे.

(३) पंडीत नेहरू यांचे परराष्ट्र धोरणाविषयीची माहिति जाणुन घेणे.

(४) पंडीत नेहरू यांचे लोकशाही व समाजवाद याविषयी माहीती जाणुन घेणे.

**संशोधन पध्दत** :—

पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे राष्ट्र निर्माणातील योगदानाचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करतांना त्या त्या काळातील ऐतिहासिक नोंदी इतर विचारवंतानी नोंदविलेली मते यांची

माहिती विविध साधनांद्वारे प्राप्त केलेली आहे. या लघुशोध निबंधासाठी संदर्भ ग्रंथ पुस्तके, गौरव ग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्र इ.दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून मुद्देसुद मांडणी करण्यात आली आहे.

**विषयाचे महत्व :–**भारताला आधुनिकतेच्या शिखरावर आणण्यात पंडीत नेहरू यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी समाजवादाला राष्ट्रसभेच्या चळवळीचे तत्वज्ञान बनविले आणि सत्तेवर आल्यानंतर ते प्रत्यक्षात आणण्याचेही प्रयत्नही केले. भारतीय स्वातंत्र्य लढयाकडे जागतिक पातळीवरील स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून पंडीत नेहरूंनी पाहीले. बंदीस्त विचार राजकारणाचे धार्मिकीकरण आणि धर्मवेड यांच्या विरूध्द लढा पुकारून त्यांनी विज्ञान निष्ठा सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांचा धर्मनिरपेक्ष विचार आणि आधुनिक दृष्टीकोन यांची कास धरली. एक विचारवंत म्हणून आणि त्याही पेक्षा आपले राजकीय विचार प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळालेले राजकीय धुरीण म्हणून पंडीत नेहरूंनी जगात महत्वाचे योगदान दिले आहे. लोकशाहीचे ते उपासक होते. व्यक्तीविकास हे त्यांच्या मते लोकशाहीचे सर्वात महत्वाचे साध्य होते. व्यक्ती आणि समाज यांच्या हितसंबंधात संतुलन राखून पंडीत नेहरूंनी लोकशाही समाजवादाची संकल्पना आखली. देशासाठी सर्वस्वाचा त्याग करून स्वातंत्र्यसाठी त्यांनी अविरत कष्ट केले. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही त्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि विकासासाठी सतत प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांनी आपले संपुर्ण आयुष्यच राजकारण व देशसेवेला अर्पण केले. त्यांनी जे कार्य केले त्यांचा विचार करणे महत्वाचे होय.

**राष्ट्रवाद** :–अध्यात्मिक अथवा धार्मिक राष्ट्र वादाबाबत पंडीत नेहरूंच्या मनात कोणतीही आस्था नव्हती. त्यांचा राष्ट्रवाद टागोरांच्या समन्वयात्मक आणि विश्वबंधुत्वाच्या कल्पनेशी समांतर अशी त्यांची राष्ट्रवादाची कल्पना होती. गांधीजींनी राष्ट्राच्या चळवळीला शातंता आणि अहींसात्मक मार्गाने राजकीय वळण प्राप्त करून दिले. तेच वळण पंडीत नेहरूंनी स्विकारले. पंडीत नेहरू म्हणतात “गैर राजकीय राष्ट्रवाद मात्र भांडवलशाहीच्या आधीपासुन अस्तित्वात होता. इतिहास साहीत्य धार्मिक परंपरा यांनी भारतीयांवर पुरातन काळापासुन ऐक्यांचे संस्कार केले असून अनाक्रमण राष्ट्रीय मनोवृत्तीची जोपासना केली आहे. त्याच धार्मिक संस्कृतीत राजकीय मनोवृत्तीने राजकीय राष्ट्रवादाच्या विकासाला व सामर्थ्याला हातभार लावला आहे.”[१]पंडीत नेहरू हे प्रखर राष्ट्रवादी होते व राष्ट्रावर सत्ता व अधिकाराचा वापर करून परकीय सरकार भारतीय लोकांना छळत असत. त्यातुन राष्ट्रवाद पोहोचला जातो. राष्ट्रवादाची संकल्पना ही तेजस्वी स्वरूपाची होती. त्यांना त्यांच्या बालवयातच राष्ट्रवादाच्या विचारांनी प्रभावित केले होते. उदार मतवादी राष्ट्रवाद व वंशश्रेष्ठत्वाचा आक्रमक राष्ट्रवाद यापैकी नेहरूंना उदारमतवादी राष्ट्रवादाने आकर्षिक केले. लोकशाही जनसार्वभौमत्व सामान्य हा व राष्ट्रांचा स्वयंनिर्यणाचा हक्क इ.चा ते राष्ट्रवादाचा समावेश करतात. भारतातील राष्ट्रवाद द्वेष व हिंसात्मक नव्हता. यातुनच त्यांचे उदारमतवादीत्व सिध्द होते. आत्मचरित्रात ते लिहीतात राष्ट्रवाद ही वस्तुत: विरोधी भावना आहे व राष्ट्रावर सत्ता गाजविणाऱ्या परकीय सरकार विरूध्द जी संतापाची व द्वेषाची भावना जागरूक होते तिचे खतपाणी मिळूनच राष्ट्रवाद पोसला जातो. त्यांचे इंग्लंडमधील वास्तवादी राष्ट्रवादाची भावना वाढीस लागण्यास कारणीभूत ठरते. तेथे लोक, सुख, समाधान, ऐश्वर्य मिळवत होते व माझी भारतीय जनता मात्र अठराविश्व दारिद्रिय सोसत होती. या तफावतीमुळे त्यांचे मन खिन्न झाले होते. युरोपातील लोकांचे राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्यांची भावना यांचे त्यांना जवळून दर्शन झाले होते. स्वातंत्र्य चळवळ जसजशी वाढत गेली तश तशी राष्ट्रवादाची भावना लोकांच्या मनात बळावत गेली. सारनाथला प्रत्यक्ष प्रवचन देणाऱ्या बुध्दाचे दर्शन झाले. अशोक स्तभाने सम्राट अशोकाचे धोरण त्यांना सांगितले. भारतातील अखंड परिवर्तनातील सांस्कृतिक सातत्याचा त्यांना साक्षात्कार झाला. अनैसर्गिक पारतंत्र्यात सापडलेल्या लहान राष्ट्राच्या मुक्तीसाठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा केली. राष्ट्रवादी प्रेरणेने त्यांना परकीय सरकारविरूध्द उभे केले ते म्हणतात स्वातंत्र्यासाठी आमचा संघर्ष सुरू आहे. राष्ट्राला नुकसान पोहचविणे हे आमचे ध्येय नाही. स्वत:चा विकास आत्मविस्तार हे एका राष्ट्रवादाचे अंग आहे. तसेच राष्ट्रवाद तत्वत: भूतकाळातील परंपरा आणि सामुहिक स्मृती आहे. राष्ट्रवाद आज जेवढा शक्तीशाली आढळून येतो तेवढा यापुर्वी कधीच नव्हता. जेव्हा संकटे येतात त्यावेळी या भावनेचे पुनरूज्जीवन होते. राष्ट्रवादाच्या साहाय्याने राजकीय, सामाजिक,

आर्थिक एकता निर्माण करता येऊ शकेल परंतु पंडीत नेहरू म्हणतात राष्ट्रवाद म्हणजे पुनर्विचार करणे नव्हे. राजकीय सामाजिक आदि क्षेत्रातील एकता किंवा समानता राष्ट्रवाद निर्माण करू शकत नाही. त्यासाठी समान कार्यही आवश्यक आहे. परस्परांचे रक्षण करून योग्य ती प्रतिक्रिया व्यक्त करणे. राष्ट्रवादी हा नि:स्वार्थी कर्मयोगी असावा येणाऱ्या संकटांना धाडसाने सामोरा जाणारा असावा. राष्ट्रवादाचे सामर्थ्य स्पष्ट करतांना त्यांनी असे म्हटले आहे की, भूतकाळातील यश, संपदा, परंपरा आणि अनुभवणाऱ्या आठवणी म्हणजे राष्ट्रवाद होय. पुर्वी एवढा राष्ट्रवाद नव्हता इतका तो आता प्रबळ बनलेला आहे. ब्रिटीश या देशातुन जोपर्यंत जाणार नाहीत तोपर्यंत या देशाचा विकास शक्य नाही ते जहालवादी असून लोकमान्य टिळकांचा त्यांचावर प्रभाव होता. त्याचप्रमाणे महात्मागांधीजींच्या अहिंसा व सत्याग्रह याचा सुध्दा परिणाम त्यांच्यावर होता. हिंसक व क्रांतीद्वारे स्वातंत्र्य मिळणे कठीण होते हे त्यांना माहित होते म्हणून सत्याग्रहाच्या साधनांचा अवलंब केला तर त्यात अनेकांना सहभागी होता येईल आणि आंदोलन परिणामकारक ठरून राष्ट्रवादाला महत्व येईल. प्रचंड जन आंदोलनाने स्वातंत्र्य मिळेल असे त्यांना वाटत होते. तसेच राष्ट्रवादाची भावना लोकांना समजल्याशिवाय भारतीयांना स्वातंत्र्य व विकास याचे महत्व कळणार नाही. पंडीत नेहरूंनी राष्ट्रवादाचा धागा लोकशाहीशी जोडला होता आणि सामान्यांच्या समस्या सोडविण्यास आवश्यक असलेली समाजवादी विचार सरणी विकसीत केली अशा या महान राष्ट्रवादी नेत्यांची प्रत्येक कृती राष्ट्रवादाच्या कल्पनेने भरलेली होती. "राष्ट्रवादाची पंडीत नेहरूंची संकल्पना जागतिक स्वरूपाची होती. त्यांच्या मते एखाद्या देशाने राष्ट्रवादाची संकल्पना प्राप्त केल्यानंतर त्या देशांनी इतर देशासाठी काम केले पाहीजे. राष्ट्रवादाचा विचार हा प्रत्येक देशांनी आंतरराष्ट्रीय वादाच्या संदर्भात केला पाहीजे. राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीयता यांच्या संबंधाची त्यांची संकल्पना व्यापक होती. याच कारणामुळे या संकल्पनेचे वैचारिक पातळीवर मोठया प्रमाणात स्वागत करण्यात आले. पहील्या व दुसऱ्या महायुध्दाचा विचार करता त्यांचा आक्रमक राष्ट्रवादास असणारा विरोध देखील स्पृहणीय होता. राष्ट्रवाद आवश्यक आहे पण तोच देशासाठी आजार होऊ नये. कारण आत्यंतिक राष्ट्रवाद हा देशास आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पडतो"[२]. पंडीत नेहरू यांनी राष्ट्रवादाच्या संकल्पनेत मोलाची भर टाकली. भारताची गौरवशाली संस्कृती, परंपरा यांना त्यांनी लोकांच्या समोर ठेवले. पोथीनिष्ठता, स्थितीशिलतेस विरोध केला संस्कृतीस त्यांनी राष्ट्रवादाला महत्वाचा आधार मानला. तसेच राष्ट्रवादास व्यापक केले. त्यास संकीर्णतेपासुन आक्रमकतेपासुन वाचवले त्यास आंतरराष्ट्रीय वादाशी जोडले. त्यांनी समाजवादास राष्ट्रवादाशी जोडले.

(२) **आंतरराष्ट्रवाद :—**"नेहरूंचा राष्ट्रवाद हा आंतरराष्ट्रवादाशी समन्वय साधणारा होता. राष्ट्राचे सामर्थ्य व ऐक्य हे राष्ट्रवादावर अवलंबुन असते परंतु वेळीच त्याचा आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनाची जोड लाभल्यास आंतरराष्ट्रवाद घडुन येईल. एकीकडे राष्ट्रवादाची भावना पुर्वीप्रमाणेच प्रबळ असली तरी तिचे वास्तव स्वरूप बदलले आहे. तिचा अविष्कार आता आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्हावा लागतो. तिला पोषक असणाऱ्या व क्वचित विनाशक ठरणाऱ्या गोष्टीही आता आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या झाल्या आहेत. भांडवलवाद, उत्पादन, बाजारपेठ, वहातुक साधने ही सर्व आंतरराष्ट्रीय स्वरूपाची झाली आहे. अशा अत्यांतिक राष्ट्रवादाने निर्माण होणारी स्वयंपुर्णतेची कल्पना आता चुकीची ठरली आहे. जगामध्ये सर्व राष्ट्रे आता परस्परावलंबी आहेत. मानवी कल्याण्याचा बुध्दीनिष्ठ व अनुभवजन्य विचार आंतरराष्ट्रीय शांततापुर्ण सहजीवनाशिवाय करता येणार नाही. जगातील सर्व मानवजात सुखी व समाधानी राहण्यासाठी राष्ट्रा—राष्ट्रात स्नेहसंबंध वाढावेत. मैत्रीच्या भावना वाढीस लागल्या पाहीजे असा विश्वबंधुत्व व विश्वशांतीचा संदेश पंडीत नेहरूंनी दिला." [३] पंडीत नेहरू हे भारताच्या परराष्ट्र धोरणेचे शिल्पकार होते. आरंभापासुन ते अखेरपर्यंत परराष्ट्र व्यवहार खात्याचे मंत्री होते. स्वातंत्र्यपुर्व काळातही नेहरूंना भारत आणि इतर देश यांचे संबंध असावे असे वाटत होते. नेहरूंनी जागतिक व्यवहाराबाबत दृष्टी होती. इतिहासाबाबतही त्यांचा विशिष्ट दृष्टकोन होता. त्यांच्यातले इतिहास हा जागतिक शक्तींच्या व्यवहारांची परिणती असते. जागतिक घटनांचा व्यक्तीनिरपेक्ष नि:पक्षपातीपणे विचार करावा असा त्यांचा दृष्टीकोन होता. आंतरराष्ट्रवाद हा पंडीत नेहरूंचा चिंतनाचा विषय होता. सध्याच्या परिस्थितीत भारत एकत्र राहू शकत नाही. कारण विज्ञान, व्यापार, वहातुक यांनी युक्त आधुनिक युग हे आंतरराष्ट्रवादाचे आधार आहेत. स्वत:चा विनाशा शिवाय कोणतेही राष्ट्र या आधुनिक जगापासुन दूर राहू शकत नाही असे

त्यांना वाटत होते. आता आणि भविष्यातही स्वयंशिस्त, सर्वांगीण प्रगती याबाबतचा योग्य दृष्टीकोनाची बाहयसंबंधाची निवड करणे आवश्यक आहे. भारताने यासाठी संकुचित दृष्टीकोन सोडावा असे त्यांचे प्रतिपादन होते. तर काँग्रेस नेत्यांच्या तुलनेत पंडीत नेहरूंचा दृष्टीकोन व्यापक होता. त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या त्यामुळे त्यांचा जागतिक संपर्कही वाढला. त्यांच्या ठिकाणी परराष्ट्र व्यवहाराविषयी निर्णय क्षमता होती. गांधीजींनी स्वत:चे क्षेत्र देशांतर्गत प्रश्नाविषयी एकवटले होते. जागतिक घटना व प्रस्तांवाबाबत चर्चा, भूमिका व कृती ही क्षेत्रे त्यांनी नेहरूंवर सोपविली होती. स्वातंत्र्योत्तर काळात संसदेत पंडीत नेहरूंनी परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध जागतिक घटनांचे अन्वयार्थ या विषायांवरील अभ्यास पुर्ण भाषणे केली. ज्येष्ठ राजकारणी त्यातुन शिकायचे ज्या देशाबाबत नेहरूंनी विशेष रस दाखविला नाही. त्या देशांचे भारताशी असलेले संबंध दुर्लक्षित राहीले. उदा.लॅटीन अमेरिकन देश अग्नेय आशियातील देश, देशाचे परराष्ट्रीय धोरण इतके नेहरूंवर विसंबुन होते. नेहरूंचे धोरण म्हणजे देशाचे धोरण असे समीकरण झाले होते. अलीप्त वादी चळवळीचे नेहरू प्रमुख नेते होते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तवाचे आकलन असणारे नेहरूंची काही मुलभूत तत्वे व शाश्वत मुल्येसमोर ठेवून आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करू इच्छित होते. या मुल्यांबाबत त्यांची वैयक्तिक बांधीलकी तर होतीच परंतु असे मुल्याधिष्ठीत परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय राजकारण भारताच्यादृष्टीने लाभदायक ठरणार आहे. याबाबतही त्यांची निष्ठा होती. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने ही मुल्ये त्यांनी अंगीकारली होती. पंचशिल नावाने ती उद्दिष्टे प्रसिध्द आहे युगोस्लाव्हीयांचे अध्यक्ष टीटो भारताच्या भेटीस आले असता या दोन देशांमध्ये पंचशिल विषयक करार झाला. पुढे भारत चीन मैत्री संबंधात ही पंचशिल तत्वे आधारभूत तत्वे म्हणून मान्य करण्यात आली ती तत्वे अशी–

(१) करार करणाऱ्या राष्ट्रांनी एकमेकांच्या प्रादेशिक अखंडत्व आणि सार्वभौमात्वाबाबत आदर बाळगावा.

(२) परस्परांवर आक्रमण न करणे.

(३) एकमेकांच्या अंतर्गत राज्यकारभार आणि कारभारात हस्तक्षेप करणे.

(४) परस्पर समतेची व सहकार्याची वागणुक.

(५) शांततामय सहजीवन व आर्थिक सहकार्याचे तत्व अनुसरण्यात यावे.

या तत्वातील आदर्शवाद हा प्राचीन भारतातील शांतता, अहिंसा ही तत्वे होती. जी हिंदू तत्वज्ञानात होती. तशीच गौतमबुध्दांच्या शिकवणीतही होती. अशोकाच्या काळात शीतयुध्द नव्हते. सत्ताकारणही नव्हते. याची नेहरूंनी आठवण करून दिली. आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरूंची जी आदर्शे होती. त्यात लोकशाही सिध्दांतावरील निष्ठा, स्वयंनिर्णयाचे तत्व आणि मानवी अधिकाराचा स्विकार यांचा समावेश होता.

(३) **परराष्ट्र धोरण** :–पंडीत नेहरूंनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी स्विकारलेले अलीप्तवादाचे धोरण तर त्यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या यशाचे गमक होते. भारताचे पहीले पंतप्रधान या नात्याने काम पाहत असतांना देशाच्या धोरणास आणि राजकारणात योग्य दिशा नेहरूंनी दिली. त्यातील बैठकीवर आधारलेले धोरण त्यांनी आखले. आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण यांचा सखोल विचार करून वेळेचे भान ठेवून त्यांनी आपले धोरण आखले होते. त्यांच्या धोरणाचा आजसुध्दा उपयोग होतांना दिसून येतो. त्यांच्या मंत्रीमंडळावर मोठा प्रभाव होता. "भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलतत्वे पंडीत नेहरूनींच निश्चित केली आणि ही तत्वे इतके विचारपुर्वक ठरविण्यात आलेली आहेत की, नेहरूनंतर सत्तेंवर अनेक मंत्रीमंडळे आली पण परराष्ट्रधोरणात मुलत: फारसाा बदल झालेला नाही. यावरून परराष्ट्र धोरणाबाबत नेहरूंचा दृष्टीकोन किती दुरदृष्टीचा होता याची कल्पना येते."[४] भारताच्या परराष्ट्र धोरणांवर पंडीत नेहरूंचा जेवढा प्रभाव होता तेवढा प्रभाव कोणत्याही नेत्यांना नव्हता. त्यांच्या विचारांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली होती. परराष्ट्र धोरणाची वैशिष्टये पुढील प्रमाणे –

(अ) **साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध** :–पंडित नेहरू यांचा साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध होता. ब्रिटीश साम्राज्यामुळे व राजवटीमुळे भारतीयांना ज्या यातना सहन कराव्या लागल्या. तेवढया कोणालाही सहन कराव्या लागल्या नसतील भारतीय लोकांची सहनशिलता त्यांनी पाहीली

त्यातुन हा विरोध निर्माण झाला. युरोपियन साम्राज्यवादाला जे देशबळी पडले त्यापैकी भारत हा एक देश होता. भारताचे नेते म्हणून नेहरूंचा ब्रिटीश राजवटीला विरोध होता. पण केवळ भारतातुन परकीयांची राजवट नष्ट व्हावी एवढेच त्यांना वाटत नव्हते. तर सर्व समाजातुन साम्राज्यवादाचा आणि वसाहत वादाचा शेवट झाला पाहीजे ही त्यांची भूमिका होती. जगातील साम्राज्यवादाचा शेवट झाल्याशिवाय मानवजातीचा विकास होणार नाही आणि जगात खऱ्या अर्थाने शांतता नांदणार नाही. ही त्यांची भूमिका होती म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही जे आशियाई आणि आफ्रिकी देश स्वतंत्र झाले नव्हते. त्यांना स्वातंत्र्य देण्याची मागणी नेहरूंनी केली आणि तेथील स्वातंत्र्यलढयाला पाठींबा दिला. आफ्रो आशियाई देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे हे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे एक सुत्र बनले.

(ब) **जागतिक शांततावाद** :—पंडीत नेहरूंनी शांततेचा पुरस्कार केला. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष युध्दांच्या मार्गाने न सोडविता शांततेच्या व विचारविनिमयाच्या मार्गाने सोडवावेत. यासाठी त्यांनी आग्रह धरला. त्यांच्यावर गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव होता. दुसऱ्या महायुध्दांचे भयंकर परिणाम जगाने पाहिले होते. या युध्दाच्या शेवटी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासकी या शहरांवर टाकलेल्या अणुबॉम्बने आधुनिक शस्त्रांचे भीषण स्वरूप जगाला दाखवुन दिले होते. जगाला कधी नव्हती. एवढी शांततेची गरज भासु लागली होती म्हणून पंडीत नेहरूंनी प्रथमपासुनच शांततेच्या धोरणाचा पुरस्कार केला. पंडीत नेहरू म्हणतात. “शांततेसाठी देशाचे परराष्ट्रीय धोरण बुध्दीवर आधारलेली असावीत गुणानुक्रमे समस्या सोडवण्यात याव्यात. विरोधासाठी विरोध ही वृत्ती सोडावी, परस्पर सामंजस्य आणि चर्चेने प्रश्न सोडविण्यात यावेत. उपयुक्त आणि महत्वाच्या घटकांची देवाण—घेवाण विविध मार्गाने वाढविले पाहिजे व्यापाराबाबत सामंज्याचे धोरण पत्करावे तसेच जास्तीत जास्त प्रमाणात सैनिकी करार टाळले की दोन गटात जगाची विभागणी झालेली दिसते. त्यांची मैत्री संपादन केली. तरी ते गट तसेच राहीले तरी त्यांचा प्रभाव शांतता वादी राष्ट्रांवर पडू शकणार नाही.”[५] दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक शांतता टिकविण्याच्या हेतुने संयुक्त राष्ट्रे या संघटनेची उभारणी करण्यात आली नेहरूंनी या संघटनेला तिच्या कार्यामध्ये सर्वतोपरी सहकार्य देण्याचे धोरण ठेवले हे सहकार्य सक्रीय होते. भारताला शक्य असेल ती मदत या संघटनेला देण्यात आली. संयुक्त राष्ट्रातर्फे शांतता प्रस्थापनाचे कार्य करण्यासाठी सायप्रस कांगो इत्यादी परदेशात पाठविण्यात आलेल्या सैन्यामध्ये भारताचा सहभाग होता. जगातील राष्ट्रांना शांतता टिकविण्याचे आवाहन करण्यासाठी व्यासपिठाचा उपयोग पंडीत नेहरूंनी केला. त्यांचा शांततावाद व्यवहारवादी होता ही गोष्ट गोवा प्रश्नावरून स्पष्ट झाली. भारतातुन बिटीशांची राजवट नष्ट झाली तरी पांडेचरी,गोवा, दिव, दमण काही भुभाग युरोपियन सत्तेखाली होते. डचांनी समजुतदारपणा दाखवून पांडेचरीवरचा आपला हक्क पोर्तुगालला सोडून दिला. पण गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती आणि पोर्तुगालमध्ये सालाझार सत्ताधिश होता. नेहरूंनी हा प्रश्न अनेक वर्ष समोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न केला. पण पोर्तुगीज त्याला दाद देत नाही असे दिसून येताच लष्करी कारवाई करून गोवा मुक्त केला. नेहरूंचे धोरण शांततावादी असले तरी अटळ असेल तेथे सामर्थ्य वापरायला त्यांनी कमी केले नाही. नेहरूंच्या शांततावादाला खरा धक्का चीनने दिला. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण करून भारताचा काही प्रदेश काबीज केला. भारताला युध्द करणे भाग पडले आणि भारत चीन मैत्रीला यामुळे तडा गेला.

(क) **पंचशिल तत्वे** :—आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात पंडीत नेहरूंनी ज्या तत्वाचा पुरस्कार केला होता ती तत्वे पंचशिल तत्वे म्हणून ओळखली जातात. ती तत्वे म्हणजे त्यांच्या जागतिक शांतता वादाचाच एक भाग बनली, राष्ट्रा राष्ट्रांमध्ये शांतता व सहकार्य होण्याच्या दृष्टीने त्यांनी पंचशिल तत्वे मांडली होती, सर्व राष्ट्रामध्ये दिसून येणारी शस्त्रात्र स्पर्धा आणि त्यातुन निर्माण होणारा अविश्वास नष्ट होवून त्याऐवजी विश्वासाचे व सहकार्याचे युग निर्माण व्हावे हा त्यामागील हेतु होता. चीनमध्ये साम्यवादी सरकार सत्तेवर आले आणि आशिया खंडात या राष्ट्रासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित करावे यासाठी पंचशिल तत्व स्विकारले. पंचशिल तत्वाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तणाव आणि संघर्ष कमी होण्यास मदत होईलच. दोन सार्वभौम राष्ट्रांनी परस्परात कशाचे संबंध प्रस्थापित करावे यासबंधीची आदर्श तत्वे म्हणजे पंचशिल तत्वे होय. अशा राष्ट्रांनी जर या तत्वाचे पालन केले तर दोन्ही राष्ट्रे आदर्शास पोहोचतील.

(ड) **गटनिरपेक्षता वाद किंवा अलिप्ततावाद :—** पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे गट निरपेक्षतता किंवा अलिप्तता हे एक महत्वाचे सुत्र आहे. सर्व जगात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून त्यांनी अलिप्ततावाद धोरण स्विकारले. दुसऱ्या महायुध्दानंतर जगाची फाळणी ही दोन गटात झाली आणि पुन्हा जागतिक स्थरावर स्पर्धा सुरू होवून अशातंता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. अमेरिका आणि त्यांचे मित्र गट यांचा एक गट दुसरा गट म्हणजे साम्यवादी रशिया व त्यांच्या मित्र राष्ट्रांचा गट. परंतु भारताने कोणत्याही एका गटात सामील न होता अलिप्त राहून आपला विकास साधता येईल म्हणून दोन्ही गटांचे सहकार्य घेवून विकास साध्य होईल यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अलिप्ततावादी धोरण स्विकारले.

(४) **लोकशाही** :—पंडीत नेहरूंचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले त्यामुळे इंग्लंडमध्ये असणाऱ्या राजकीय वातावरणाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. इंग्लंडमध्ये व्यक्तीला व्यक्ती स्वातंत्र्य मिळत असल्याने व्यक्ती स्वातंत्र्याचे फायदे कोणते याचा अनुभव त्यांना इंग्लंडमध्ये आला. तसेच संसदीय शासनपध्दती त्यांना अनुभवयाला मिळाली. लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य, उदारमतवाद, समाजवाद, संसदीय शासन पध्दती या सर्व संकल्पना त्यांना इंग्लंडच्या अनुभवावरून लक्षात आल्या. भारतात त्या राबविणे कसे अपरिहार्य आहे याची जाणिव त्यांना झाली. स्वातंत्र्यपुर्व काळात विविध सामाजिक समस्या होत्या. त्यांची सोडवणूक करणे आवश्यक होते. साम्राज्यवाद, धर्मसंघर्ष, जातीवर आधारीत झगडे, जुलूमशाही यामुळे जनता त्रासली होती. या सर्व समस्यांवरील पर्याय म्हणजे लोकशाहीत आहे. याची जाणिव पंडीत नेहरूंनी झाली होती. "पंडीत नेहरूंना भारतात पुर्ण लोकशाही आणावयाची होती. ती सर्वांना स्वातंत्र्य मिळवून देईल. आर्थिक व सामाजिक समता, सामाजिक बंधूभाव निर्माण करेल. लोकशाही म्हणजे केवळ व्यक्तीस्वातंत्र्य प्रतिनीधीक लोकशाही आर्थिक व सामाजिक समता नाही. तर प्रश्नांकडे जाण्याचा स्वयंशिस्तीवर आधारलेला शांततामय मार्ग होय."[६] पंडीत नेहरूंची लोकशाहीवर निष्ठा होती. त्यांच्या सर्व राजकीय कारकिर्दीत लोकशाही तत्वांशी ते कायमचे निष्ठावान राहीले. भारतात ब्रिटीश वसाहत वादाने जी जुलूमशाही निर्माण केली होती ती त्यांना अधिकच जाचक वाटू लागली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात जी शासन पध्दती स्विकारावयाची ती लोकशाही शासन पध्दतीत असली पाहीजे हे ध्येय स्वातंत्र्यापुर्वीच नेहरूंनी निश्चित केले होते. भारताच्या घटना परीषदेने स्वतंत्र भारतासाठी जी राज्य घटना तयार केली ती संसदीय लोकशाही स्वातंत्र्य आणि समता कायद्याची अस्मिता अशा मुल तत्वावर आधारीत आहे. लोकशाहीमध्ये स्वातंत्र्याचे आणि समतेचे तत्व स्विकारलेले असते.माणसाच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी योग्य असे वातावरण आणि परिस्थिती फक्त लोकशाहीतच लाभू शकते. यामुळे लोकशाही हा केवळ शासन संस्थेचा प्रकार रहात नाही तो जीवन जगण्याचाच एक मार्ग बनतो. लोकशाहीला आणखी एक पैलू आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रयत्न लोकशाहीत केले जातात. आर्थिक, सामाजिक, राजकीय समतेचे तत्व लोकशाहीमध्ये स्विकारलेले असते आणि विकासाचाा लाभ समाजातील सर्व थरातील लोकांना कसा मिळेल याचा विचार लोकशाहीत होत असतो म्हणून लोकशाहीचा मार्ग हा सामाजिक कल्याणाचा मार्ग आहे. लोकशाहीची त्यांची संकल्पना व्यापक होती. केवळ राजकीय क्षेत्रापुरती ती मर्यादीत नव्हती. भारतात जी लोकशाही जोपासण्याचा ते प्रयत्न करीत होते ती केवळ राजकीय लोकशाही नव्हती तर आर्थिक आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापीत करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. नेहरू त्याला परिपूर्ण लोकशाही म्हणत होते. त्यात विविध प्रकारचे व्यक्तीस्वातंत्र्य अभिप्रेत होतेच पण त्याचबरोबर सामाजिक दर्जा आणि व्यक्ती विकासाची समान संधीचा त्यात त्यांना स्थान होते. तळागाळातील सामान्य माणसाला अधिक चांगले जीवन जगण्यासाठी विकासाची संधी प्राप्त करून देण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते. तसेच खऱ्या लोकशाही पध्दतीच्या निर्मितीसाठी लोकशाहीला पोषक अशी समाजमनाची घडण निर्माण होणे आवश्यक असते. सहिष्णुता, दुसऱ्याच्या विचारांचा आदर करण्याची वृत्ती आणि नैतिक मूल्यांची जोपासना लोकशाहीसाठी आवश्यक तत्वे आहेत असे पंडीत नेहरूंचे मत होते.

(५) **समाजवाद** :—"भारतात जर आर्थिक व सामाजिक पुर्नरचना करावयाची असेल तर केवळ समाजवादातुनच करता येईल याची पंडीत नेहरूंना खात्री होती. परंतु हा बदल करण्यासाठी हिंसा, क्रांती, सक्ती किंवा बळाचा वापर यावर त्यांचा विश्वास नव्हता. सर्व सामाजिक समस्या

सोडविण्यासाठी त्यांच्याकडे शासकीय दृष्टीकोनातून पाहिले पाहीजे याची जाणिव नेहरूंना समाजवादाने करून दिली. केवळ परिणामांशी झुंजण्याऐवजी त्या परिणामांची कारणे शोधणे आवश्यक आहे. परिणामांची कारणे शोधुन त्यांचे उच्चाटन केले तर आपोआपच परिणामांचेही निमुर्लन होईल ही खात्री नेहरूंना असल्यामुळे त्यांनी समाजवादी विचारसरणी भारतात उपयुक्त असल्याचे ठामपणे सांगितले" [७] पंडीत नेहरू हे जसे लोकशाही वादी होते तसेच ते समाजवादी होते. समाजवाद—साम्यवाद या विचारसरणीचे आरंभी त्यांना आकर्षण होते. जॉर्ज बर्नार्ड शॉ, बरस्ट्रांड रसेल, केन्स यांच्या विचारांचा प्रभाव नेहरूंवर होता.१९९२ मध्ये कारागृहात असतांना देशाच्या आर्थिक, सामाजिक, विकासात ते रस घेऊ लागले होते पुढे या विचारसरणीची समीक्षा त्यांनी केली. त्यावर सखोल चिंतन केले. जगात या विचारप्रणाली कशा अमलात आणल्या जात आहे याचे त्यांनी निरीक्षण केले. भारतात स्वातंत्र्य चळवळीच्या काळात समाजवादाचा पाया घातला. भारतातील सामाजिक व आर्थिक स्थिती इतर देशांपेक्षा वेगळी आहे तेव्हा समता स्थापन करण्यासाठी इतर देशांनी ज्या पध्दतीच्या मार्गाचा वापर केला ते मार्ग भारतात वापरता येणार नाहीत. नेहरूंना समाजवादाचे आकर्षण होते. पण त्याचबरोबर उदारमतवादाचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यामुळे ते व्यक्तीवादास अनुकूल होते. सामाजिक, आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वातंत्र्याची गरज आहे. स्वातंत्र्य ही सामाजिक बदलाची पुर्वअट आहे. समाजाचा विकास हे ध्येय आहे. स्वातंत्र्यप्राप्ती हा मार्गातील महत्वाचा टप्पा आहे. समाजवादासंबंधी नेहरूंचे विचार ताठर नाहीत त्यात वास्तविकतेचे भान आहे. त्यांनी मार्क्सवादातील हिंसेस विरोध केला तसेच गांधीजींच्या विश्वस्तांच्या संकल्पनेस अशक्य म्हणून विरोध केला. त्यांच्या मते समाजवादी समाजरचना केल्यास व्यक्तीस स्वातंत्र्य असेल व्यक्तीची प्रतिष्ठा असेल तेथे सामाजिक आर्थिक न्याय असेल. आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले असेल व हे सर्व शांततेच्या मार्गाने झालेले असेल. समाजवादी समाजरचनेत मर्यादीत संपत्तीचा अधिकार असेल व राज्यनियंत्रणही असेल.पंडीत नेहरूंच्या समाजवादाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील. (१) भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा विरोध, (२) हिंसेचा त्याग, (३)उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण, (४) दारिद्रय निर्मुलन (५) आवश्यक वस्तुंचे वितरण, (६) सामुहीक हिताला प्राधान्य, (७) संमिश्र अर्थव्यवस्था, (८)व्यक्तीस्वातंत्र्य, (९) खाजगी मालमत्तेवर निर्बंध, (१०) आर्थिक नियोजन, (११)समाजवादाचे व्यापक स्वरूप. भारतातील सरंजामशाही, भांडवलशाही शोषण थांबविण्यासाठी तसेच बेकारी व उपासमार थांबविण्यासाठी, राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी तर समाजवाद आवश्यक आहे. या व्यतिरिक्त आपल्या संबंधी विचार करण्याची पध्दती, जीवनमुल्ये योग्य करण्यासाठी समाजवादी तत्वज्ञानाची गरज आहे.

(६) **धर्मनिरपेक्षता** :—धर्मनिरपेक्षता म्हणजे शासनाचा अधिकृत धर्म नसणे, सर्व धर्मांना समान संधी सर्व धर्मीयांना समान संधी होय. सदृढ लोकशाहीची स्थापना करण्यासाठी आणि परंपरा विरोध करण्याच्या प्रवृत्तीतून पंडीत नेहरू धर्मनिरपेक्ष बनले होते "पंडीत नेहरूंची धर्मनिरपेक्षतेची संकल्पना ही राजकीय भौतिक होती. तशीच सामाजिक आणि मानसशास्त्रीय देखील होती. ते पाश्चात्य धर्मनिरपेक्षतेचे समर्पक होते. सर्व धर्मांना समान दर्जा, सर्व धर्मियांना समान संधी, कोणत्याही धर्माला वा धार्मिक गटाला भेदभावाची वागणूक नसणे, धर्मनिरपेक्षमध्ये नेहरूंना अभिप्रेत होते. कोणत्याही एका धर्माला इतर धर्माच्या विरोधात विशेष हक्क असणार नाही याबाबत ते सतर्क होते"[८] नेहरू म्हणतात. जीवनाचा राजकीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रापासुन धर्म वेगळा करणे या क्षेत्राची व धर्माची फारकत करणे, धर्म ही वैयक्तिक बाब होय. राज्यसंस्थेने कोणत्याही एकाच धर्माशी संलग्न असू नये. स्वधर्मांना पूर्व स्वातंत्र्य असावे. परधर्म हा सुध्दा तेवढाच महत्वाचा जेवढा स्वधर्म, धर्माचा विचार भेदाभेद न करता सर्व धर्माच्या लोकांना समान वागणूक देणे होय. तसेच त्यांनी सांगितले धर्मनिरपेक्षतेचे सर्वात महत्वाचे तत्व म्हणजे सर्व धर्मात समान दर्जा प्राप्त करून देणे. सर्व धर्मनिरपेक्ष लोकांना आपल्या धर्मानुसार आचरण, पुजा, आर्चाविधी करण्याचे स्वातंत्र्य असावे, कोणत्याच धर्माला विशेष सवलती व अग्रक्रम नसावा. कोणालाच आपल्या कायदेशिर हक्कांना धार्मिक कारणास्तव मुकावे लागू नये. भारतीय सामाजिक परिस्थितीत धर्मनिरपेक्षता हाच एकमेव उपाय आहे. भारतातील हिदू, मुस्लिम, शिख आदि धर्मीयांमध्ये परस्पर सुसंवाद आणि सामजस्यं निर्माण होणे. भारताच्या दृष्टीने हितकारक ठरणार

आहे. त्यासाठी सर्व धर्मांना समान दर्जा, सर्व धर्मीयांना धार्मिक स्वातंत्र्य भारतासाठी आवश्यक आहे. मंदीर, मशिदीने प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांच्यातील परस्पर सद्‌भावच प्रश्न सोडवील यालाच पंडीत नेहरू धर्मनिरपेक्षतता म्हणतात. धर्मनिरपेक्षता या युगात सामाजिक हिताचे एक साधन होऊ शकते त्यासाठी धर्माचा सत्य शास्त्रीय स्वरूपाचा अभ्यास आवश्यक आहे. धर्माचा असाच आशय पंडीत नेहरूंना अभिप्रेत होता.

**मुल्यमापन :—**पंडीत जवाहरलाल नेहरू राजकारणी होते. परंतु त्यांच्या राजकारणाला सिध्दांताची बैठक होती. त्यांनी नविन राजकीय सिध्दांत मांडले नाहीत. देशाच्या स्वातंत्र्य लढयासाठी व पुढे स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाही, समाजवाद, आंतरराष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षवाद हे सिध्दांत पूरक करण्याच्या दृष्टीने नेहरू प्रयत्नशीर होते. नेहरू स्वभावत:च व्यक्तीवादी व मानवतावादी होते. व्यक्तीला व्यक्तीच्या स्वातंत्र्याला ते राज्यापेक्षा महत्व देत म्हणून त्यांनी साम्यवादाची कार्यपध्दती स्विकारली नाही. स्वातंत्र्य, समता, व्यक्तीची प्रतिष्ठा या लोकशाही मूल्यांवर पंडीत नेहरूंची नितांत श्रध्दा होती. चांगल्या सुसंस्कृत संपन्न जीवनाकडे जाणारे लोकशाही हे साधन आहे. त्यामुळे त्यांच्या विचारात एकाधिकारासाठी सत्तेचे केंद्रीकरणाला स्थान नव्हते. अलिप्तता हे धोरण समोर ठेवून तिसऱ्या जगातील राष्ट्राचे नेतृत्व त्यांनी केले जागतिक शांततेसाठी त्यांनी हे धोरण आवश्यक आहे हे विकसनशिल राष्ट्रे आणि प्रगत राष्ट्रे यांना पटवून दिले. आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये संयुक्त राष्ट्र संघाला महत्वाचे स्थान दिले. ते राष्ट्रवादी होते पण त्यांचा आक्रमक, हिंसक किंवा साम्राज्यवादी नव्हता. त्यांच्या या विचार सरणीमुळे भारतीय राष्ट्रवाद पंडीत नेहरूंच्या निधनानंतरही विधायक आणि शांततावादी राहीला. पंडीत नेहरूंनी शांततावादी सहजीवनाचा मंत्र जगाला दिला. भारताच्या निर्मितीत पंडीत नेहरूंचा फार मोठा वाटा आहे. प्रत्यक्ष कृतीने त्यांनी देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासाला हातभार लावला. लोकशाही, समाजवाद, प्रेम, शांतता, सहजीवन आदींवर त्यांची श्रध्दा होती. मानवता वाद, विश्वबंधुत्व आदीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे राजकारणाला व विचाराला महत्व मिळवून दिले. त्यांच्या विज्ञान वादी दृष्टीकोनाचा सतत फायदा झाला. सर्वच क्षेत्रातील पुरोगामी दृष्टीकोन पंडीत नेहरू यांनी स्विकारलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ सुची**

(१) डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपुर. पहीला आवृत्ती जून १९९५पृ.क्र. १७२.

(२) प्रा.कुळकर्णी बी.वाय., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातुर,पृ.क्र. २६५.

(३) डॉ.कळंबे दिनकर एस., भारतीय राजकीय विचारवंत,कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट २००६ पृ. क्र. ८९

(४) प्रा.वराडकर र.घ., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याप्रकाशन, नागपुर, पुर्नमुद्रण २००५, पृ. क्र.२४

(५) प्रा.चोपडे किसन, भारतीय राजकीय विचार,विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती सप्टेंबर २००२,पृ. क्र. १६३, १६४

(६) डॉ.राठी शुभांगी , भारतीय राजकीय विचार,अथर्व पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथम आवृत्ती २०१४,पृ. क्र.१३८

(७) प्रा.पळशीकर रेखा, प्रा.देवळाणकर शैलेंद्र, स्वतंत्र भारतातील राजकीय विचारवंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. प्रथम प्रकाशन,जुलै २००२, पृ क्र. १२.